# कै.आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील विद्यालयात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय

**शिरोळ : प्रतिनिधी–**

येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना चारिटेबल ट्रस्ट संचलित डॉ.अप्पासाहेब उर्फ सा.रे. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकलमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खास प्रयत्न करण्यात येणार आहेत. वेगवेगळ्या योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कॉलेजच्या कॉम्प्युटर इंजिनियरिंग विभागाची नुकतीच Departmental Advisory Board बैठक संपन्न झाली.



या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबर अभ्यासाची गुणवत्ता, उद्योगाच्या बदलत्या गरजा आणि विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये विभागाचे व्हीजन, मिशन, अभ्यासक्रमांमधील गॅप, शेवटच्या वर्षाचे प्रोजेक्ट, स्टार्टअप, व्हॅल्यू ॲडेड कोर्सस अशा विविध विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लागणाऱ्या गोष्टींवरती चर्चा झाली.

या बैठकीसाठी ॲकॅडमिक एक्सपर्ट चैतन्य पेडणेकर, इंडस्ट्री एक्सपर्ट अविनाश सकट, विद्यार्थी प्रतिनिधी आशुतोष माळी व राकेश गोसावी संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व प्राचार्य डॉ. डी. एन. मुदगल, उपप्राचार्य पी. आर. पाटील, डीन इंजि. सौ.एस.एन.पवार, कॉम्प्युटर विभागप्रमुख एस.पी.चव्हाण तसेच विभागातील शिक्षक सौ. पी.पी. ढेकळे व कु.एम.एस.शिंदे आदी बैठकीला उपस्थित होते. सदर बैठक पार पडण्यासाठी श्री दत्त उद्योग समूहाचे प्रमुख उद्यानपंडीत गणपतराव (दादा) पाटील, दत्त कारखान्याचे चेअरमन रघुनाथ पाटील, व्हा. चेअरमन शरदचंद्र पाठक, एक्स ऑफिसीओ ट्रस्टी संजीव देसाई, संचालक ए. एम. नानिवडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.